# पर्यावरणविषयक जनसुनावणीचे इतिवृत्त

**मेसर्स मीनाक्षी फेरो इन्गोट प्रायव्हेट लिमिटेड, गट क्रं. ३५० व ३६१, भांडगाव, खोर रस्ता, यवत, तालुका - दौंड, जिल्हा - पुणे महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पातील एम.एस. इन्गोट / बिलेट्स उत्पादन क्षमता विस्तारिकरण २,०००.०टन/महिना ते १५,०००.० टन/महिना करणेबाबत दि.२६/०६/२०१९ रोजी झालेल्या पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचे इतिवृत्त.**

मेसर्स मीनाक्षी फेरो इन्गोट प्रायव्हेट लिमिटेड, गट क्रं. ३५० व ३६१, भांडगाव, खोर रस्ता, यवत, तालुका - दौंड, जिल्हा - पुणे महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पातील एम.एस. इन्गोट / बिलेट्स् उत्पादन क्षमता विस्तारिकरण २,०००.०टन/महिना ते १५,०००.० टन/महिना करणेसाठी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी दिनांक २६ जून, २०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यात आलेली होती.

सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई - ४१/२०१९,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी - २३०५, दिनांक २६-०६-२०१९ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती गठन करण्यात आलीः-

१) जिल्हादंडाधिकारी ,पुणे किंवा (त्यांचे प्रतिनिधी) - **अध्यक्ष**

२) प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,पुणे (प्रतिनिधी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ) - **सदस्य,**

३) उप प्रादेशिक अधिकारी, पुणे-१ महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे - **समन्वयक**

श्री नितीन शिंदे, उप प्रादेशिक अधिकारी,पुणे-१, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समितीच्या अध्यक्षांचे आणि उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

समन्वयक यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या वने , व हवामान बदल पर्यावरण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. श्री शिंदे यांनी असे सांगितले की उप प्रादेशिक कार्यालय, पुणे-१, मप्रनि मंडळ, पुणे यांना प्रकल्प प्रवर्तक मेसर्स मीनाक्षी फेरो इन्गोट प्रायव्हेट लिमिटेड, गट क्रं. ३५० व ३६१, भांडगाव, खोर रस्ता, यवत, तालुका - दौंड, जिल्हा-पुणे महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पातील एम.एस. इन्गोट /एम.एस.बिलेट्स उत्पादन क्षमता विस्तारिकरण २,००० टन/महिना ते १५,००० टन/महिना करणेसाठी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी आयोजित करण्यासाठी मंडळाकडे अर्ज सादर केला होता. सदरहू प्रक्ल्पातील वार्षिक उत्पादन हे ३०,००० टनापेक्षा जास्त होत असल्याने या प्रकल्पास महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागातील तज्ज्ञ समितीची म्हणजे State Environment Appraisal Committee /(SEAC) राज्य पर्यावरण आघात मुल्यांकन समिती कडून "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी घेणे बंधनकारक आहे. सदरहू प्रकल्प हा घोषित औद्योगिक विभाग क्षेत्राबाहेर कार्यान्वित असून प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ (सुधारित) अन्वये **संवर्ग ब ३ (अ)** मोडत आहे.

त्यामुळे प्रकल्प प्रवर्तकांनी महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागातील तज्ज्ञ मुल्यांकन समितीस पर्यावरण आघात मुल्यांकन अभ्यासाच्या मंजुरीसाठी प्रस्ताव सादर केला व त्यास महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागातील तज्ज्ञ मुल्यांकन समितीने १५४ व्या बैठकीत दिनांक २९ ऑगस्ट, २०१८ रोजी प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान केली.

समन्वयक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा सुनावणी इतिवृत्तांत समावेश करणे हा आहे.

वरिल पर्यावरण अधिसुचनेनुसार तीस दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी बाबत सूचना देणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, पुणे-१, मप्रनि मंडळ, पुणे यांनी स्थानिक वृत्तपत्र लोकसत्ता यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत दिनांक २४-०५-२०१९ रोजी जाहिर सुनावणी सूचना दिलेली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ते लेखी नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा पर्यावरण मुल्यांकन आघाताची व कार्यकारी सारांशाची प्रत भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल, पश्चिम-मध्य विभाग कार्यालय, न्यू सेक्रेटरिएट इमारत, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर- ४४० ००१,मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय-पुणे, मा. अप्पर जिल्हादंडाधिकारी कार्यालय, पुणे, जिल्हा-पुणे, मुख्य कार्यकारी अधिकारी -जिल्हा परिषद, पुणे, महाव्यवस्थापक-जिल्हा उद्योग केंद्र, पुणे , उप विभागीय अधिकारी, दौंड, तालुका - दौंड, जिल्हा-पुणे, तहसीलदार- तालुका कार्यालय-दौंड, जिल्हा - पुणे, ग्रामपंचायत कार्यालये - भांडगाव, केडगाव, निंबळ कालवाडी, यवत, दोरगेवस्ती, धनगरवाडी, चौफुला, खोर, खुतभाव, वाखरी, तालुका-दौंड, जिल्हा-पुणे, मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे, उप प्रादेशिक कार्यालय,पुणे-१, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेत स्थळावर सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्यात आलेली होती.

समन्वयक यांनी सांगितले की वरिल प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पास कालपर्यंत एकही सूचना वा आक्षेप प्राप्त झालेली नाही. समन्यवयक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधी देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले. श्री शिंदे यांनी पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी सुरु करण्याची विनंती मा. अध्यक्षांना केली.

डॉ. जयश्री कटारे, अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, पुणे तथा अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी प्रकल्प अधिका-यांना व त्यांच्या पर्यावरण सल्लागारांना पर्यावरण विषयक उपाय योजनांची माहिती शासनाच्या व स्थानिक भाषा मराठीतून करण्याची सूचना केली व सर्व जनसमूहाला निर्भयतेने त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचनाअसल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले.

प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागारांनी पर्यावरण विषयक उपाय योजनांची माहिती सादरीकरणाव्दारे उपस्थित जनसमूहास दिली.

श्री दिलीप खेडकर, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे तथा सदस्य , पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन माहिती दिली की सदरहू प्रकल्पातली उत्पादन हे दर वर्षी ३०,००० टनापेक्षा जास्त असल्याने त्यास पर्यावरण अनुमती घेणे बंधनकारक आहे. त्यासाठी प्रकल्प प्रवर्तकांना परिसरातील पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्याची परवानगी देण्यात आली. त्यास टर्म्स ऑफ रेफरन्स म्हणतात. त्यात परिसरातील सदस्यस्थिती, प्रदूषणाची पातळी व प्रस्तावित प्रकल्पामुळे भविष्यात पर्यावरणावर होणारा परिणाम याचे मुल्यमापन व त्याबाबत उपाययोजना करण्यासाठी अभ्यास करणे योग्य असते. त्यांनी केलेला अभ्यास व प्रस्तावित प्रकल्पातील प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा व भविष्यातील सामाजिक व पर्यावरण बांधिलकी याबाबत सविस्तर माहिती सादरीकरणात दिलेली आहे. तरी प्रकल्पाबाबत काही पर्यावरणीय सूचना, आक्षेप असल्यास ते उपस्थित करण्याचे आवाहन केले. प्रकल्पातील व इतर काही स्थानिक बाबी असतीलतर त्याचे व्यासपीठ वेगळे आहे. आपण सूचना वा आक्षेप, मत सांगण्याअगोदर नांव व गावाचे नांव सांगण्याची सूचना त्यांनी केली.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रतिनिधींकडून/प्रकल्प सल्लागार/पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

१) <u>दादासाहेब रामभाऊ टेळे, राहणार-भांडगांव, तालुका - दौंड, जिल्हा-पुणेः-</u>

श्री टेळे यांना असे मत मांडले की सदरहू प्रकल्प हा १५ वर्षांपूर्वी कार्यरत झाला. आता विस्तार करण्याचा प्रकल्प प्रवर्तकांचा मानस आहे. छोटे लावलेले रोपटे आता

मोठे केले व आता विस्तार केलेला आहे. त्यांनी हरित पट्टा विकसित केलेला आहे. प्रदूषण थांबविण्यासाठी वृक्षारोपण करण्याची गरज आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी प्रकल्पातून उत्पन्न होणारे प्रदूषण/धुलीकण थांबविण्यासाठी प्रकल्पात सुधारणा करुन सुंदर प्रकल्प उभारलेला आहे. आम्ही प्रकल्पाची पाहणी केली. अतिशय सुंदर काम करत आहेत. प्रकल्पामुळे स्थानिकांना रोजगार उपलब्ध झालेला आहे. बरेच स्थानिक प्रकल्पात कार्यरत आहेत.

प्रकल्प प्रवर्तकांनी परिसरातील निसर्गाचाही विचार करावा. प्रकल्प व्यवस्थापनाने सीएसआर अंतर्गत सामाजिक काम करावे. त्याचप्रमाणे वृक्षलागवड करावी. त्यासाठी ग्रामस्थांचे सहकार्य घेऊन नियोजन करावे. त्यांनी प्रकल्प विस्तारिकरणास शुभेच्छा दिल्या.

२) <u>श्री बाळासाहेब बबनराव दोरगे,अध्यक्ष, तंटामुक्ती समिती, भांडगाव, राहणार-भांडगांव,तालुका - दौंड, जिल्हा-पुणेः-</u>

श्री दोरगे यांनी सांगितले की ते परिसरातील तंटामुक्तीचे अध्यक्ष आहेत. येथील स्थानिक फक्त शेतीवर उदरनिर्वाह करतात. शेतीशिवाय काही उत्पन्नाचे साधन नाही. त्यांनी सांगितले की प्रकल्पाच्या प्रदूषणाचा त्रास गावातील लोकांना होतो, ते प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे तक्रार करतात. इतर लोक वेगळ्या कामासाठी करतात. ते तंटामुक्ती अध्यक्ष असल्याने त्यांच्याकडेच हा विषय येतो. त्यांनी पुढे असे मत नोंदविले की प्रकल्प प्रवर्तक विस्तारिकरण करत आहेत. आताच्या २,००० टन/महिना असताना त्रास होतो, तर तो १५,००० टन/महिना झाल्यावर काय होईल ही कल्पना आम्हांला आहे. पण त्यातूनही मार्ग निघाला. स्थानिकांना प्रकल्प हवा आहे. येथे प्रकल्प यावेत, ते वाढावेत व टिकावेत. प्रकल्प प्रवर्तक हे ग्रामपंचायतीस सहकार्य करतात. प्रकल्प हा कार्यरत राहायला हवाच. ग्रामपंचायतही सहकार्य करेल. मात्र स्थानिकांना त्रास होतो हे जरी शास्त्रीयदृष्ट्या खरे वा चुक असेल, पण लोकांकडून कळते की त्यांना त्रास हा होत आहे. त्यासाठी प्रदूषण नियंत्रण मंडळाने ४-८ दिवसांनी अधिकारी व कर्मचा-यांची समिती पाठवावी. त्यांनी २ कि.मी. परिसराची पाहणी करुन गावक-यांशीही बोलणी करावी. ग्रामपंचायत सहकार्य करेल.

मात्र, प्रकल्प प्रवर्तकांना जर पर्यावरणावर काम करायचे असेल तर त्यांनी गावात प्रथम यावर्षी हरित क्रांती कार्यक्रम पहिला राबवावा. ग्रामपंचायत सहकार्य करेल. अभ्यास करावा. मार्ग निघेल. हे सर्व सांघिक काम आहे. हरित क्रांतीसाठी पंचायत सहकार्य करेल.

प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की केंद्र सरकारच्या निर्देशांप्रमाणे ३३% हरितपट्टा विकसित करणे बंधनकारक आहे.

पर्यावरण सल्लागार यांनी पुढे आश्वासन दिले की भांडगाव व १० कि.मी. परिघात येणा-या इतर गावे येथे वृक्षलागवड करण्यात येईल व त्याची देखभालही प्रकल्प प्रवर्तक करणार आहेत. प्रकल्पामुळे कोणाचीही हानी होऊ नये याबाबत प्रकल्प प्रवर्तक काळजी घेतील

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती सदस्य श्री खेडकर यांनी सांगितले की तंटामुक्ती अध्यक्षांनी सुंदर प्रश्न विचारला व शासनाकडून अपेक्षा व्यक्त केलेल्या आहेत. त्यांनी सांगीतले की ते मप्रनि मंडळाचे प्रतिनिधी म्हणून आलेले आहेत. त्यांनी सांगितले की सदरहू प्रकल्प हा छोटा होता. आता विस्तारिकरण प्रस्तावित आहे. जर ३०,००० म.टन पेक्षा जास्त जर उत्पादन असेल, तर त्यास पर्यावरण अनुमती घेणे बंधनकारक आहे. त्यास मप्रनि मंडळ व पर्यावरण विभाग हे अनुमती देताना कडक निर्बंध घालते व ते पाळणे बंधनकारक आहे. त्याचप्रमाणे मप्रनि मंडळ व पर्यावरण विभाग हे वेळोवेळी पाहणी करत असतात. तरी स्थानिकांना निश्चित राहावे अशी सूचना त्यांनी केली.

३) <u>श्री महेश भाऊसाहेब बोरकर,राहणार-भांडगांव, तालुका-दौंड, जिल्हा-पुणेः-</u>

प्रकल्प परिसरात बरेच स्थानिक युवक शिकलेले आहेत. भांडगावाबरोबरच आजूबाजूच्यी पंचक्रोशीतील तरुणांना रोजगाराची संधि उपलब्ध करुन देण्यात यावी.

प्रकल्प प्रवर्तकांनी माहिती दिली की प्रकल्पात स्थानिकच कार्यरत आहेत. येथे येणारे वाहनचालक वाहनमालक झालेले आहेत. पुढेही स्थानिकांना रोजगार देऊ. त्याचप्रमाणे प्रकल्पात लागणारे कुशल, अर्धकुशल व अकुशल पदांवर कामासाठी स्थानिकांनाच प्राधान्य देण्यात येईल. जे अकुशल आहेत, त्यांना कुशल करण्याचे प्रशिक्षण देऊन रोजगार देण्यात येईल.

४) <u>श्री शहाजी दोरगे,राहणार-भांडगांव, तालुका-दौंड, जिल्हा-पुणेः-</u>

प्रकल्पात माल घेऊन येणा-या ट्रक्समुळे ब-याचप्रमाणात धुळ उडते. त्यावर काय उपाययोजना करण्यात येतील.

प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की प्रकल्पात पक्के रस्ते बांधण्यात येतील. त्याचप्रमाणे प्रकल्पात रस्तावर पाणी फवारणे ही स्प्रिकलिंग व्यवस्था कार्यान्वित करण्यात येणार आहे. त्यामुळे धुळ उडणार नाही.

५) <u>श्री रविंद्र जाधव, राहणार-भांडगांव, तालुका-दौंड, जिल्हा-पुणेः</u>

पावसाचे पाणी वाचविण्याचे प्रकल्प प्रवर्तकांचे नियोजन काय आहे?

पावसाचे पाणी वाचविण्यासाठी प्रकल्पात खड्डे प्रस्तावित करण्यात येणार आहेत. ते साठवून पावसाचे पाणीच जास्तीतजास्त वापरण्यात येईल. आमचा जास्तीतजास्त प्रयत्न पावसाचे पाणी वाचवणे व ते वापरणे हाच असेल.

६) <u>श्री अरुण गणपत चव्हाण, राहणार-यवत, तालुका-दौंड, जिल्हा-पुणेः-</u>

गावातील गरीब होतकरु मुलांना त्यांना शिक्षणासाठी प्रकल्प प्रवर्तक काय मदत करु शकतील?

प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की गावातली गरीब मुलांच्या शिक्षणासाठी निश्चितच मदत करण्यात येईल. मागच्या वेळेस ग्रामपंचायत शाळेतील मुलांना जी मुले पायी खूप लांबून येत, त्यांना कंपनीने सायकली भेट दिल्या होत्या. शाळेला ज्या ज्या गोष्टींची गरज पडेल, त्या देण्यात येतील.

७) <u>श्री तात्या गोविंद जाधव,स्थानिक व्क्तीः-</u>

त्यांनी सांगितले की त्यांनी ६०/- रुपयांपासून कामाला सुरवात केलेली आहे. कामाची गरज आहे. प्रकल्पात काही माळी काम असल्यास बोलवावे.

प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की प्रकल्प प्रवर्तकांनी ३३% हरितपट्टा विकसित केलेला असून प्रकल्पात माळी व सफाई कामगार यांची आवश्यकता आहे. आपण त्यावेळेस आल्यास आपल्याला काम देण्यात येईल.

यावेळी समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी उपस्थितांना त्यांच्या काही सूचना वा आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले.

८) <u>श्री सुरेन्द्र जाधव, राहणार-भांडगांव, तालुका-दौंड, जिल्हा-पुणेः</u>

प्रकल्पात उत्पन्न होणारा घन कचरा, त्यास स्लग (राळ) म्हणतात, त्याचे व्यवस्थापन कसे करण्यात येईल?

प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की अभ्यासकांनी असे सांगितले आहे की स्लग ही नदीतील वाळूपेक्षा जास्त भक्कम असते. प्रकल्पात स्लरी ही प्रकल्पातील रस्ता दुरुस्त करण्यासाठी वापरण्यात आलेली आहे. वास्तविक लोकांनी ती घरे बांधताना वापरली पाहिजे. जर स्थानिकांनी स्लग मागितली, तर ती पुरविण्यात येईल. ग्रामपंचायतीस लागल्यास त्यांना मोफत देण्यात येईल. घन कचरा म्हणजे स्लग ही बाहेर फेकण्यात येत नाही. तर प्रकल्पातील स्लग ही स्थानिक वीट कारखान्यांना वीट बनविण्यासाठी देण्यात येते. ती प्रदूषणमुक्त आहे.

९) <u>श्री रामदास दोरगे,राहणार-भांडगांव, तालुका-दौंड, जिल्हा-पुणेः</u>

गावात १४-१५ कंपन्या आहेत. मात्र इतर कंपन्यांपेक्षा या कंपनीच्या प्रदूषणाचा त्रास स्थानिकांना जास्त होतो. दिवसा यांचा एकच प्लँट चालू असतो, पण रात्री सर्व प्लँट चालू असतात. दिवसापेक्षा रात्री परिसरातील जनतेस प्रदूषणाचा त्रास होतो गावातील लोकसंख्या वाढत आहे. कंपनीलगत रस्ता जातो. तेथे स्थानिकांची वर्दळ असते. प्रदूषणामुळे त्यांना व आसपासच्या रहिवाशांना त्रास होऊ शकतो. मात्र स्थानिकांना विकासासाठी प्रकल्प आवश्यक आहे. तरी प्रकल्प व्यवस्थापनाने प्रदूषण होऊ नये म्हणुन उपाययोजना करावीत. भांडगाव ग्रामपंचायतीने वारंवार अनेक पत्रे प्रकल्प प्रवर्तकांना याबाबत दिली आहेत. दिलेल्या सर्व सूचनांचे पालन करण्यात यावे. त्यांनी सुधारण केली. विस्तारिकरण व्हावे, त्याचप्रमाणे प्रदूषणाचा त्रास नागरिकांना व शेतक-यांना होऊ नये अशी आमची मागणी आहे. गावात १४-१५ कंपन्या आहेत. त्यांचा त्रास होत नाही. जिथे त्रास होतो, तेथे स्थानिक बोलतात. प्रकल्पाच्या विस्तारिकरणाच्या आम्ही विरुध्द नाही.

प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की प्रकल्पात वॉटर स्क्रबर सयंत्रणा होती, ती बदलून नविन सयंत्रणा कार्यान्वित करण्यात आलेली आहे. आपण (रामदास चोरगे) काही दिवसांपूर्वी येऊन प्लॅट व सयंत्रणेची पाहणी केलेली आहे. त्याचप्रमाणे ग्रामपंचायत सदस्यांनीही पाहणी केलेली आहे. त्यांनी सर्व सयंत्रणा योग्यप्रकारे

कार्यान्वित असल्याचा निर्वाळा दिलेला आहे. भविष्यात प्रकल्पामुळे कोणाचेही नुकसान होणार नाही याची काळजी घेण्यात येईल हे आश्वासन कंपनीतर्फे देण्यात येत आहे.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी सांगितले की या कंपनीमुळे मुख्यतः धुराचा त्रास होत असेल. त्यासाठी त्यांनी सुधारणा केलेली असून स्थानिकांना धुराचा त्रास न होण्यासाठी सयंत्रणा कार्यान्वित आहे. . त्याचप्रमाणे प्रकल्पात ऑनलाईन मॉनिटरिंग सयंत्रणा कार्यान्वित करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. त्यामुळे प्रकल्पातील धुराच्या पातळीवर मप्रनि मंडळाच्या कार्यालयातून लक्ष ठेवता येईल. त्यामुळे धुरातील प्रदूषणावर लक्ष ठेवता येईल.

अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी Corporate Environment Responsibility (CER) Fund/कॉर्पोरेट पर्यावरण जबाबदारी निधी व प्रकल्प प्रवर्तकांनी राखीव ठेवलेल्या १२ लाख निधींबाबत व मंजूरीबाबत विचारणा केली. प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की केंद्र शासनाच्या पर्यावरण,वने, हवामान बदल मंत्रालयाच्या १ मे, २०१८ रोजीच्या निर्देशांनुसारच अतिरिक्त भांडवली खर्चाच्या २%प्रमाणे राखीव ठेवण्यात आलेला आहे.

अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनीया सामाजीक योजंनांसाठी मंजूरी घेतलेली आहे काय याबाबत विचारणा केली. प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की अधिसूचनेप्रमाणे फक्त विशिष्ट योजनांची नावे जी त्या परिसरात शैक्षणिक व सामाजीक विकासास मदत करेल ती घेतली. एखाद्या गावाने जर दुस-या कामासाठी मागितल्यास त्याप्रमाणे खर्च करण्यात येईल.

सदस्य व समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी उपस्थितांना काही सूचना, आक्षेप वा टीकाटिप्पणी असल्यास त्या उपस्थित करण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून प्रतिसाद नव्हता.

समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी बैठकीचा समारोप करताना सांगितले की उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप, टिकाटिप्पणी यांची नोंद घेण्यात आलेली असून त्याचा अंतर्भाव हा बैठकीच्या इतिवृतान्तात करण्यात येईल. सदरहू इतिवृत्त अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन

अहवालासोबत महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागातील तज्ज्ञ समितीस सादर करण्यात येईल. तज्ज्ञ समिती याबाबत योग्य तो निर्णय घेईल.

समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी उपस्थित स्थानिकांचे, शासकीय अधिकारी, प्रकल्प अधिकारी यांचे आभार मानले व बैठकीचे कामकाज पूर्ण झाल्याचे जाहिर केले.

माननीय अध्यक्षांचे आभार मानून बैठक संस्थिगत करण्यात आली.

**( नितीन शिंदे, )**
समन्वयक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी
समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,पुणे-१,
मप्रनि मंडळ, पुणे

**(दिलीप खेडकर,)**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी
समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, पुणे

**(डॉ. जयश्री कटारे)**
अध्यक्षा,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, पुणे
जिल्हा-पुणे